## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०८/२०२५ मध्ये निशाणी ०१ खाली आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज अर्जदारांनी मयत दाजिबा मुंजाजी डुकरे यांचे वारस असल्याबाबत मुंबई वारसा अधिनियम अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे की, अर्जदार क्र.०१ ही मयत दाजिबा मुंजाजी डुकरे यांची पत्नी असून अर्जदार क्र.०२ ते ०४ त्यांचे मुले असून अर्जदार क्र.०५ त्यांची मुलगी आहे व अर्जदार क्र.०६ ही मयताची आई आहे. दाजिबा मुंजाजी डुकरे हे तोंडापूर ता. कळमनुरी जि. हिंगोली येथील कायमचे रहिवासी होते. दाजिबा मुंजाजी डुकरे हे दिनांक ०२/०६/२०१६ रोजी मयत झालेले आहेत. म्हणून दाजिबा मुंजाजी डुकरे यांचे मृत्यू नंतर अर्जदार हे वारस आहेत. शासकीय कामासाठी मयत दाजिबा मुंजाजी डुकरे यांचे अर्जदार हे वारस असल्यासंबंधी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रस्तूत अर्जाद्वारे मागणी केली आहे.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने दै.गाववाला वृत्तपत्रातून जाहिर प्रगटन देवून हरकत व आक्षेप मागविण्यात आले. परंतु प्रकरणात हजर होवून कोणीही उजर घेतलेला नाही.

४. प्रस्तूत अर्जाच्या अनुषंगाने खालील मुददे विचाराधीन येतात. सदर मुदयांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | काय अर्जदार मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळविण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २) | काय आदेश ? | अर्ज मंजूर |

**<u>का र ण मि मां सा</u>**

५. अर्जदारा तर्फे सा.क्र.०१ पांडूरंग दाजीबा डुकरे (अर्जदार) यांनी त्यांचे साक्ष सरतपासाचे शपथपत्र निशाणी ०९ वर दाखल केले. याशिवाय अर्जदारांनी सदर अर्जाच्या पुष्ठयर्थ दै.गाववाला वृत्तपत्रात दिलेल्या जाहिर प्रगटनाची मूळ प्रत निशाणी १० व मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत निशाणी ११ वर दाखल केले. तसेच अर्जदारांनी पुरावा बंदची पुरशिस दाखल करून आपला पुरावा बंद केला.

६. अर्जदारा तर्फे सा.क्र.०१ यांनी त्यांचे साक्ष सरतपासाचे शपथपत्रात असे नमूद केले की, दाजिबा मुंजाजी डुकरे हे दिनांक ०२/०६/२०१६ रोजी मयत झालेले आहेत. दाजिबा मुंजाजी डुकरे यांचे मृत्यू नंतर अर्जदार हे वारस आहेत. अर्जदारा तर्फे दाखल करण्यात आलेले मृत्यू प्रमाणपत्राची प्रत निशाणी ११ वरून दाजिबा मुंजाजी डुकरे यांचा मृत्यू दिनांक ०२/०६/२०१६ रोजी झाल्याचे स्पष्ट होते. याशिवाय दिनांक ११/०१/२०२५ दैनिक गाववाला वृत्तमानपत्रात जाहिर प्रगटन देवून देखील प्रकरणात हजर होवून कोणीही हरकत व आक्षेप नोंदविलेला नाही. त्यामुळे अर्जदार हे मयत दाजिबा मुंजाजी डुकरे यांचे वारस असल्याचे स्पष्ट होते. सदर प्रकरणा मध्ये कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे योग्य

व उचित होणार आहे. अर्जाचे स्वरूप पाहता अर्जदारांनी शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची मागणी केल्याचे दिसून येते. त्यामुळे खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) मयत दाजिबा मुंजाजी डुकरे यांचे अर्जदार हे वारस आहेत. त्यामुळे अर्जदारांच्या हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे.

३) अर्जदारांनी नियमाप्रमाणे मुद्रांक व कोर्ट फि दयावी.

PANDAV SUJAY PRAKASHRAO

Digitally signed by PANDAV SUJAY PRAKASHRAO
Date: 2025.02.27 12:49:37 +0530

दिनांक २७/०२/२०२५.

(एस.पी.पांडव )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कळमनूरी.